# महाराष्ट्र विधानपरिषद

## द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२४

**अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

### राज्यातील प्रत्येक शाळांमध्ये कला व क्रीडा शिक्षकांची नेमणूक करणेबाबत

**(१) १३११० (०६-०४-२०२२) श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक शाळांमध्ये कला व क्रीडा शिक्षकांच्या नेमणूका करण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शाळांमध्ये कला व क्रीडा शिक्षकांची नेमणूका करण्याबाबत शिक्षक संघटनेकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांच्या मागणीची दखल घेऊन प्रत्येक शाळांमध्ये कला व क्रीडा शिक्षकांची नेमणूक करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०१-१२-२०२३) :** (१), (२) व (३) राज्यातील कला, क्रीडा शिक्षकांच्या नियुक्तासंदर्भात मा.उच्च न्यायालयात विविध रिट याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार घ्यावयाच्या धोरणात्मक निर्णयाचा मसुदा मा.उच्च न्यायालयासमोर सादर करण्यात आलेला असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### खेड (जि.पुणे) सेझ क्षेत्रात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत

**(२) १६८११ (२८-१२-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खेडच्या पूर्व भागातील सेझ क्षेत्रात काही दिवसांपासून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे कंपनी व्यवस्थापन, कामगार व स्थानिक नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागात पोलीस चौकी उभारण्यात यावी असा ग्रामस्थांनी केलेला प्रस्तावही महासंचालकांकडे सादर करण्यात आला असून अद्यापही प्रस्ताव प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुन्हेगारी रोखण्यासाठी लवकरात लवकर पोलीस चौकी उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०२४) :** (१) व (२) अशी वस्तुस्थिती नाही. तथापि, माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये ॲटोजन कंपनीमधील स्क्रॅपच्या ठेक्यावरुन खेड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६७२/२०२२ भादंवि कलम १४३, १४७, १४९, ३४१, ३८७, ५०४, ५०६ व गु.र.नं.७३९/२०२२ भादंवि कलम ३४१, ३२४, ३२३, १४३, १४७, १४९, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

पुणे जिल्ह्यातील खेडच्या पूर्व भागातील सेझ क्षेत्रात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याबाबत तक्रार प्राप्त होताच संबंधितांवर तात्काळ योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(३) व (४) शासनाने पोलीस चौकी निर्माण करण्याबाबत निश्चित केलेल्या निकषानुसार त्यामध्ये नवीन पोलीस चौकीकरीता जागा, मनुष्यबळ, आवर्ती, अनावर्ती खर्चाचा तपशील, वाहने, गुन्ह्यांची आकडेवारी, संमतीपत्र, नकाशे इत्यादी बाबींची पूर्तता करण्यात येत असून, सदर बाबींची पुर्तता होताच सदर भागात पोलीस चौकी उभारण्याच्या प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(३) १७०५८ (२५-०३-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण होत असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांत औषधांचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता औषध खरेदी करण्यासाठी महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत ऑनलाईन पध्दतीने निविदा प्रक्रिया राबवून एकूण १२ औषध अनुसूचींची दरपत्रके निर्गमित करण्यात येतात.

सदर अनुसूची संपुष्टात येण्यापूर्वी मागविलेल्या औषधांचा साठा संपल्यामुळे काही विविक्षित औषधांची कमतरता जाणवली होती. रुग्णसेवा विस्कळीत होऊ नये म्हणून रुग्णालयीन स्तरावर सदर विविक्षित औषधे प्रचलित पध्दतीनुसार स्थानिक पातळीवर तसेच ई-दरपत्रिकेद्वारे खरेदी करुन रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात आली. नवीन अनुसूची दरपत्रक प्रसारित होईपर्यंत जुन्याच दराने पूर्वीच्या कंत्राटदाराकडून संमतीपत्र घेऊन औषधांची खरेदी केली जाते.

तसेच, बाह्यरुग्ण विभाग व कक्षांमधील रुग्णांना काही विशिष्ट आजारांकरीता लागणारी महागडी औषधे ही रुग्णालयातील समाजसेवकांमार्फत देणगी स्वरुपात उपलब्ध करुन दिली जातात. दारिद्रय रेषेखालील गरिब आणि दुर्बल घटकातील रुग्णांना अनुसुचित नसलेली तात्काळ लागणारी औषधे गरिब रुग्ण धर्मादाय निधीमधून उपलब्ध करुन दिली जातात.

तसेच, जननी शिशु सुरक्षा योजना, महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना व प्रधानमंत्री जीवनदायी आरोग्य योजना या योजनांमधून रुग्णांवर नि:शुल्क उपचार करण्यात येतात व औषधे उपलब्ध करुन दिली जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एटापल्ली ते कसनपूर (जि.गडचिरोली) या रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४) १७५०९ (२५-०३-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एटापल्ली ते कसनपूर (जि.गडचिरोली) या १५ किमी अंतराच्या रस्त्याचे काम सुरु असून सदर रस्त्यावर पूर्ण खोदकाम करुन ठेवले असल्याने सदर परिसरातील नागरीकांना येजा करण्यास त्रास सहन करावा लागत असल्याचे दिनांक २०/१२/२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (०९-०१-२०२४) :** (१) व (२) एटापल्ली ते कसनपूर या रस्त्याचे काम हायब्रिड ॲन्युईटी योजनेंतर्गत प्रगतीत असून मार्च, २०२४ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मावळ (जि.पुणे) येथील खेळांडूकरिता क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(५) १८३२४ (२५-०३-२०२३) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) येथील खेळाडूंकरिता एकही क्रीडा संकुल नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मावळमध्ये क्रीडा संकुल नसल्याने पोलीस भरती व केंद्रीय राखीव दलाच्या सरावासाठी तेथील युवकांना,खेळांडूना पुण्यातील मैदानात जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मावळ (जि.पुणे) तालुक्यात क्रीडा संकुल व्हावे याकरिता सन २००७ मध्ये पहिला प्रस्ताव दिला त्यानंतर सात प्रस्ताव सादर करुनही गत १६ वर्ष सदर प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रस्तावास तातडीने मंजूरी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे (३०-११-२०२३) :** (१) व (२) अंशत खरे आहे.
(३) होय.
मावळ तालुक्याचे मुख्यालयी तालुका क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी सुयोग्य शासकीय जमीन उपलब्ध होत नसल्याने मौजे जांभूळ ता.मावळ येथे तालुका क्रीडा संकुलाची उभारणी करण्याकरीता क्रीडा विभागाने जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दिनांक ११/०७/२०२२ रोजी जागेची मागणी केलेली आहे. जागा क्रीडा विभागाला हस्तांतरीत झाल्यावर क्रीडा संकुल उभारणीची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतीतून वीजेची चोरी होत असल्याबाबत

**(६) १८९८५ (०८-०८-२०२३) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतीतून वीजेची चोरी होत असल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने विविध भागात भाड्याने इमारती दिल्या असून त्या इमारतीतून अधिकारी महानगरपालिकेच्या वीज मीटरमधून विदयुत वाहने चार्जिंग करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतीतून वीजेची चोरी करणाऱ्या संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०१-२०२४) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.
पिंपरी येथील निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क ई व एफ विभाग, महाराष्ट्र राज्य यांना मनपाने भाड्याने दिलेल्या कार्यालयातील एक कर्मचारी वॉटर कुलरसाठी बसविलेल्या प्लग मधून स्वत:ची दुचाकी चार्जींग करत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) सदर ठिकाणी कोणत्याही कर्मचाऱ्याने खाजगी वाहने चार्जींग न करणेबाबत सक्त सूचना दिल्या असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे पळसवाडी (ता.जि.धाराशीव) हद्दीतील रस्त्याच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(७) १९१३७ (०८-०८-२०२३) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पळसवाडी (ता.जि.धाराशीव) हद्दीमध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्त्याचे काम सुरू असून रस्त्यासाठी व दोन्ही बाजूने पाणी जाण्यासाठी पुरेशी शासकीय जागा उपलब्ध असतानाही संबंधित यंत्रणेने खाजगी मालमत्तेच्या शेतातून माती काम व कच्चा रस्ता करताना केला आहे व त्याच बाजूला पाणी जाण्यासाठी चारी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला मोठ्या चारीची गरज नसताना मोठी चारी करुन चारीच्या पलीकडे शासनाची जागा रिकामी सोडल्यामुळे गट नंबर १२८ व १२९ मधील रस्ता विनाकारण नियमबाह्यरित्या खूपच अरुंद झाला असून गट नंबर १११, ११४, १२५ १२६ १२८ मधील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतच्या कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, धाराशीव, यांना संबंधितानी वारंवार तक्रारी करूनही योग्य ती दखल न घेतल्यामुळे नुकसानग्रस्त गट नंबरची शासकीय मोजणी करून रस्ता योग्य रुंदीचा करावा व दोन्ही बाजूने पाणी जाण्यासाठी चारी करावी यासाठी संबंधित यंत्रणेला अनियमितता तपासून योग्य काम करण्यासाठी योग्य ते आदेश देवून संबंधितांवर कारवाई करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०९-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदरहू रस्त्याचे काम अस्तित्वात असलेल्या वहीवाटी व रूंदी यामध्येच करण्यात आले आहे. त्यात शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

(३) रस्त्याच्या एकूण लांबी १२ कि.मी. असून त्यापैकी ५०० मी वर शेतकऱ्यांचा विरोध असल्याने काम अपूर्ण आहे. उर्वरीत रस्ता सुस्थितीत आहे व वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील आदिवासी रुग्णांना रुग्णालयापर्यंत नेण्याकरीता मदत करणाऱ्या भूमकांना मानधन देण्याबाबत

**(८) १९१५० (०८-०८-२०२३) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी रुग्णांना रुग्णालयापर्यंत पोहोचविण्यासाठी आरोग्य यंत्रणा भूमका या समाजापर्यंत पोहोचली असून धारणी (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथे आरोग्य विभागाने दोन दिवसीय प्रशिक्षण घेतले असल्याचे माहे मार्च, २०२३ रोजीच्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात कुपोषण, माता-बालमृत्यूचा प्रश्न कायम असल्याने ८ वर्षापूर्वी प्रशासनाने भूमकांची मदत घेऊन रुग्णांना रुग्णालयात येण्याचे आवाहन केले होते, परंतु आर्थिक मोबदला नसल्याने भूमकांचा प्रतिसाद मिळत नसल्याने आता भूमकांनी रुग्णाचा जीव वाचविण्यासाठी त्यांना रूग्णालयात आणण्यात पुढाकार घेतल्यास त्याना शासनामार्फत प्रतिरुग्ण १०० रुपये मानधन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूमकांना सदरील मानधन हे तज्ज्ञ डॉक्टरांचे प्रशिक्षण आणि रुग्ण कल्याण समितीकडून मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी भूमकांनी आतापर्यंत किती रुग्णांना आरोग्य रुग्णालयात उपचार दिले आहेत, तसेच किती भूमकांना मानधन प्राप्त झाले आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०८-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

दिनांक २८/०३/२०२३ (ता.चिखलदरा आणि चुर्णी) व (ता.धारणी) दिनांक २९/०३/२०२३ रोजी भूमका पडियार यांचे एक दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले.
(२) हे खरे आहे.

स्थानिक जिल्हास्तरावरून प्रती रूग्ण १०० रू (दर महिन्याला ४ रूग्णापर्यंत) रूग्ण कल्याण समिती निधीमधून मोबदला देण्यात येत आहे.
(३) हे खरे आहे.

प्रशिक्षण तज्ञ प्रशिक्षकांमार्फत देण्यात येत आहे. तसेच सद्य:स्थितीत मानधन रूग्ण कल्याण समितीमार्फत स्थनिक स्तरावर देण्यात येत आहे.
(४) सन २०२३-२४ या वर्षात (ऑगस्ट २०२३ अखेर)१५ रूग्णांना १५ भुमका पडियार यांनी संदर्भित केले आहे. त्याकरिता भुमका/पडियार यांना मोबदला अदा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आलापल्ली ते आष्टी (जि.गडचिरोली) या राष्ट्रीय महामार्गाची सुरजागड प्रकल्पाच्या वाहतुकीमुळे दुरवस्था झाल्याबाबत

**(९) १९३९२ (०४-०८-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरजागड प्रकल्पाच्या वाहतुकीमुळे आलापल्ली ते आष्टी (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) या राष्ट्रीय महामार्गाची दुरवस्था झाली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१९-१२-२०२३) :** (१) व (२) सदर महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारित आहे.

हे अंशत: खरे आहे.

आलापल्ली ते आष्टी या ४५ कि.मी. लांबीच्या महामार्गामधील लगाम ते आष्टी या १७ कि.मी. लांबीच्या नुतनीकरणाचे काम प्रगतीत असून ९० टक्के काम पूर्ण झाले आहे व रस्ता वाहतूकीस योग्य आहे. उर्वरित आलापल्ली ते लगाम या २८ कि.मी.लांबीचे उन्नतीकरण व मजबुतीकरणाचे कामास माहे फेब्रुवारी २३ मध्ये रस्ते वाहतूक व महामार्ग, मंत्रालय यांची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर कामास वन विभागाची परवानगी प्राप्त होण्याची प्रक्रिया प्रगतीत असून ती प्राप्त होताच निविदा प्रक्रिया पूर्ण करुन रस्त्याच्या कामास तात्काळ सुरुवात करण्याचे नियोजन आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## मुंबई व मुंबई उपनगरातील २१६ अतिधोकादायक इमारतीतील रहिवाशांचे स्थलांतरण न केल्याबाबत

**(१०) १९४४१ (०८-०८-२०२३) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व मुंबई उपनगरातील एकूण २१६ इमारती अतिधोकादायक असल्याने इमारतीचे दिनांक १८ मे, २०२३ रोजी पाणी बंद करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धोकादायक असलेल्या इमारतीतील रहिवाशांचे स्थलांतर अदयाप करण्यात आले नाही हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, रहिवाशांची राहण्याची व्यवस्था न करण्याची कारणे काय आहेत व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) मुंबई शहर आणि उपनगरातील अतिधोकादायक इमारतींबाबत पदनिर्देशित अधिकाऱ्यांकडून जलजोडण्या खंडीत करण्याबाबत निर्देश प्राप्त होतात. सदर निर्देशानुसार दिनांक १८ मे, २०२३ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई शहर व उपनगरातील अतिधोकादायक इमारतींपैकी ११९ इमारतींच्या १९० जलजोडण्या खंडीत करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) सदर अतिधोकादायक असलेल्या इमारतींपैकी एकूण ८८ इमारती रिकाम्या करण्यात आल्या असून, सदर इमारती या खाजगी मालमत्ता असल्याने सदर मालमत्तांमधील रहिवाशांचे स्थलांतर करण्याची जबाबदारी ही इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांची व संबंधित इमारत मालकाची असते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगाव (जि.जळगाव) जिल्ह्यातील मन्याड धरणाची उंची वाढविणेबाबत

**(११) २०१६९ (०४-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगाव) जिल्ह्यातील मन्याड धरणाची उंची वाढविण्याची मागणी स्थानिक नागरिकानी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदरहू प्रकल्पाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू धरणाची उंची वाढवून पाणी साठ्यात वाढ करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-१२-२०२३) :** (१) होय,

दिनांक १८/०७/२०१९ च्या निवेदनाद्वारे स्थानिक ग्रामस्थांनी मागणी केली आहे.
(२) नाही.
(३) सदर प्रकल्पाच्या उंचीवाढीकरीता प्रथमत: पाणी उपलब्धतेची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत सन २०१८ मध्ये मंजूर राज्य एकात्मिक जल अराखड्यानुसार मन्याड प्रकल्प असलेले गिरणा उपखोरे हे तुटीचे खोरे आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत प्रकल्पाच्या उंचीवाढीकरीता पाणी उपलब्धता होऊ शकत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विविध गुन्हयांमुळे निलंबित अधिकारी व अभियंत्यांना कोरोना कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेने पुन्हा सेवेत सामावून घेतल्याबाबत

**(१२) २०२०४ (०९-०८-२०२३) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विविध गुन्हयांमुळे निलंबित कलेल्या ११६ अधिकारी व अभियंत्यांना कोरोना काळात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुन्हा तात्पुरत्या सेवेत सामावून घेण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनाची साथ आता संपली असतानाही निलंबित झालेल्या ११६ कर्मचाऱ्यांबाबत शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे,
(३) असल्यास, सदर निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर कर्मचाऱ्यांची प्रकरणे नजिकच्या पुनर्विलोकन समितीत बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती-दर्यापूर (जि.अमरावती) येथील मुख्य मार्गाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१३) २०४९२ (०४-०८-२०२३) श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती-दर्यापूर (जि.अमरावती) येथील मुख्य मार्गाचे काम गत वर्षी हायब्रीड ॲन्युटीमोड अंतर्गत बांधकाम करण्यात आले,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यावर डांबरीकरणाचे काम अनियमित व निकृष्ट दर्जाचे (उंच सखल) केल्याने मोठ्या प्रमाणात दुर्घटनांचे प्रमाण वाढलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तदनुषंगाने सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित दोषी ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (०९-०१-२०२४) :** (१) अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर वलगाव रस्ता रामा-४७ या रस्त्याचे काम हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत करण्यात आले आहे.
(२) व (३) सदरचे काम हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत कामाच्या सवलत करारनाम्यातील तरतूदी, निकष व मानकाप्रमाणे कार्यान्वयीत करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीकरीता सुस्थितीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य मानवी हक्क आयोगाच्या सन २०२०-२१ च्या अहवालाबाबत

**(१४) २०५३९ (०४-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मानवी हक्क आयोगाने सन २०२०-२०२१ मधील कामाचा अहवाल नुकताच सादर केला असून त्यात मानवी हक्काचे सर्वाधिक उल्लंघन पोलीस खात्यात झाले असल्याची बाब माहे मे २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अहवालानुसार कामाचे उल्लंघन केलेल्या पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०२३) :** (१) राज्य मानवी हक्क आयोगाकडे वर्ष २०२०-२०२१ मध्ये पोलीसांविरुध्द ३१७२ तक्रारी प्राप्त झाल्या असून, सदर तक्रारींपैकी ६ प्रकरणामध्ये पोलीसांविरुध्दचे आरोप सिध्द झालेले आहेत.
(२) राज्य मानवी हक्क आयोगाकडून त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींवर सुनावणी घेवून, त्यानुषंगाने शासनाकडे शिफारशी करण्यात येतात. आयोगाने प्रकरणानुरूप शिफारशी केल्यानुसार संबंधित पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्यावर आयोगाच्या शिफारशी / आदेशानुसार शासनाकडून कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) येथील आरटीईचे सर्व्हर बंद असल्याने विद्यार्थ्यांना प्रवेशांप्रक्रिया पूर्ण करण्यास अडचणी येत असल्याबाबत

**(१५) २०५६० (०४-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, अ‍ॅड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) येथील आरटीईचे सर्व्हर बंद असल्याने विद्यार्थ्यांना प्रवेशप्रक्रिया पूर्ण करण्यास अडचणी येत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षणाचा अधिकार (आरटीई) अंतर्गत शासनामार्फत ऑनलाईन फॉर्म भरून घेत असून पोर्टल बंद असल्याने प्रवेशाच्यावेळी अनेक पालकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांना सर्व सोयी सवलती उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती उपाययोजना / कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (३०-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) ऑनलाईन पोर्टलवरील ऑनलाईन प्रवेशपत्र काढण्याकरीता सर्व्हर बंद असल्याने तांत्रीक अडचणी निर्माण झाल्या होत्या.त्या संदर्भात प्रवेशप्रक्रियेसाठी पुरेसा कालावधी देण्याबाबत वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. अंतिम मुदतवाढ दिनांक २२/०५/२०२३ पर्यंत देण्यात आली होती. त्यानुसार सर्व बालकांच्या पालकांचे कागदपत्र पडताळणी करून २०६९ इतके प्रवेश देण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील गैरव्यवहाराची एसआयटीमार्फत चौकशी करणेबाबत

**(१६) २०५७६ (०९-०८-२०२३) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध कामांमध्ये नोव्हेंबर, २०२१ ते ऑक्टोबर, २०२२ या काळात झालेल्या १२ हजार कोटीच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचा तसेच कंत्राट देताना नियमांचे उल्लंघन झाल्याचा ठपका कॅगने ठेवला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची विषय चौकशी समितीमार्फत करण्यात यावी व या संदर्भात प्राथमिक माहिती अहवाल (एफ.आय.आर) दाखल करण्यात यावा, अशी मागणी केल्याबाबतचे पत्र मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना दिल्याची माहिती मा.लोकप्रतिनिधी यांनी पत्रकार परिषदेत दिली असून तद्संदर्भात केलेल्या तक्रारीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दिनांक २१ जून, २०२३ रोजी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी समिती (SIT) गठीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील गाव आणि गावठाण भागात मलनिःसारण वाहिन्यांचे जाळे निर्माण करण्याबाबत

**(१७) २०६२२ (०९-०८-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील गाव आणि गावठाण भागात मलनिःसारण वाहिन्यांचे जाळे नसल्याने शिरवणे गाव जुईपाड्यासह नवी मुंबईतील बहुतांश गाव-गावठाण परिसरातील अनेक ठिकाणच्या मलनिःसारण वाहिन्या नाले व गटारांना जोडल्या गेल्याची बाब माहे एप्रिल,२०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात दुर्गंधी पसरून मच्छरांची पैदास मोठ्या प्रमाणात होत असतानाही नवी मुंबई महानगरपालिका त्यावर जाणीवपूर्वक कारवाई करत नसल्याने स्थानिक नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मलःनिसारण वाहिन्या थेट गटारात न टाकता स्वतंत्र करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-११-२०२३) :** (१) नवी मुंबई क्षेत्रातील जुईपाडा गावात मलनि:स्सारण तुंबल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये आढळून आल्यानंतर, सदर मलनि:स्सारण वाहिनीची यांत्रिकी पध्दतीने साफ सफाई करून घेण्यात आलेली आहे.

तद्नंतर महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नेरूळ भागातील शिरवणे, जुईपाडा या गावात सद्य:स्थितीत एकूण ११,२७६ कि.मी. लांबीच्या मलनि:स्सारण वाहिन्या टाकलेल्या आहेत.

सदर मलनि:स्सारण वाहिन्यातील सांडपाणी पंप हाऊसद्वारे नजीकच्या मलप्रक्रिया केंद्रात पाठविण्यात येत असून, सदर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते.

सदर गावातील सांडपाणी भूमीगत मलवाहिन्यांद्वारे मलउदंचन केंद्राच्या ठिकाणी एकत्रित करण्यात येते. तद्नंतर सदर सांडपाण्याचे उदंचन करून सेक्टर-२० सानपाडा येथील मलप्रक्रिया केंद्रामध्ये (STP) प्रक्रियेकरीता पाठविण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## एक्सर रोड (बोरीवली) येथील मोकळ्या भूखंडावर विकासकाकडून अनधिकृत भराव टाकल्याबाबत

**(१८) २०६६२ (०८-०८-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एक्सर रोड (बोरीवली) येथील पेडामकर निवास चाळीच्या समोरील मोकळ्या भूखंडावर विकासकाकडून अनधिकृत भराव टाकण्यात आला असल्याबाबतची लेखी तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहाय्यक आयुक्त, आर-मध्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दिनांक २८ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी टाकण्यात येत असलेल्या अनधिकृत भरावामुळे पावसाळ्यात सखल भागात असलेल्या पेडामकर निवास चाळीत पाणी साठून मालमत्ता वा जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरहू ठिकाणी अनधिकृतपणे भराव टाकणाऱ्या संबंधित विकासकावर शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) एक्सर रोड (बोरीवली) येथील पेडामकर निवास चाळीच्या समोरील मोकळ्या भूखंडावर भराव टाकण्यात आला असल्याबाबतची लेखी तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

सदर भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेचा असून हस्तांतरादरम्यान सखल भाग होता.सदर ठिकाणी उद्यानाचे आरक्षण असून भूखंडाचा विकास प्रस्तावित असल्याने भूखंड समतल करण्याकरीता सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भराव टाकण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोरीवली (पूर्व) येथील महात्मा गांधी क्रॉस रस्त्यावरील ड्रेनेजची झाकणे तुटली असल्याबाबत

**(१९) २०६६३ (०९-०८-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (पूर्व) येथील महात्मा गांधी क्रॉस रस्त्यावर अनेक ठिकाणी ड्रेनेजची झाकणे तुटलेली असल्याने, तसेच काही ठिकाणी झाकणेच नसल्याने पादचाऱ्यांच्या विशेषत: शालेय विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला असल्याची गंभीर बाब दिनांक २३ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्यावरील ड्रेनेजवर पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने झाकणे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) व (२) सदर ठिकाणी वारंवार झाकण चोरी केली जाते. त्याअनुषंगाने स्थानिक पोलीस ठाण्यात वेळोवेळी गुन्हा दाखल करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे. तथापि, झाकण चोरीला गेल्यास चोरीला गेलेली झाकणे बदलण्यात आलेली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कनिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नतीचे लाभ मंजूर करण्याबाबत

**(२०) २०८३९ (०८-०८-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १७१०२ ला दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वरिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील पदोन्नतीसाठी घेण्यात आलेल्या अहर्ताकारी परीक्षेत गैरप्रकार झाल्याप्रकरणी प्राथमिक चौकशी अहवालानुसार, परीक्षेतील अनियमिततेस बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन मुख्य लेखापरीक्षक जबाबदार असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्यावर सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ७८अ (१)(ड) आणि बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम २०१५ मधील नियम क्र. १५ नुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १७ जानेवारी,२०२३ रोजीच्या पत्रानुसार शासनाच्या वित्त विभागास कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परीक्षेचा निकाल साडेचार वर्षे उलटूनही जाहीर न झाल्याने कनिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू परीक्षा रद्दबातल करण्यासंदर्भात हालचाली सुरु असून सदरहू परीक्षा रद्दबातल केल्यास गत साडेचार वर्षापासून निकालाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या शेकडो कनिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार असल्याने स्थायी समितीच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या ठरावानुसार परीक्षेची अट शिथिल करुन कालबध्द पदोन्नतीचे लाभ मंजूर करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ७८ अ(१) नुसार महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षक या पदावरील अधिकाऱ्याची राज्य शासनासाकडून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार तत्कालीन मुख्य लेखा परीक्षक यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आली होती व सद्य:स्थितीत ते बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत नसल्याने सुधारीम मुंबई महानगरपालिका अधिनियम ७८ अ (१)(ड) आणि बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम २०१५ मधील नियम १५ नुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी दिनांक १७/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये वित्त विभागास कळविण्यात आले आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक विभागातील वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदावरील पदोन्नतीसाठी अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सन २००४ नंतर मुख्य लेखापरीक्षक विभागात खात्यांतर्गत परीक्षा घेण्यात आली नव्हती.

तत्कालीन महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांकडून दिनांक २३, २४ व २५ नोव्हेंबर, २०१८ रोजी खात्यांतर्गत परीक्षा घेण्यात आली. परंतु परीक्षेबाबत गंभीर तक्रारी प्राप्त झाल्याने तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांचे आदेशानुसार परीक्षेची प्रक्रिया थांबविण्यात आली व परिणामी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला नाही. नियमानुसार तक्रारींची तपासणी करुन तक्रारींची सत्यता तपासण्यात आली असून सदर परीक्षा प्रक्रियेत अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी दिसून आले आहे.

(३) सदर प्रकरणी अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांनी दिनांक ०२/०५/२०२२ रोजी अहवाल सादर केला असून, वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदाच्या पदोन्नती परीक्षा प्रक्रियेमध्ये सकृतदर्शन परीक्षापूर्व कामकाज, प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षेचे आयोजन व परीक्षा केंद्रावरील कामकाज, उत्तरपत्रिकेचे सांकेतिकीकरण / प्रशासकीय त्रुटी आढळून आल्याने सदर परीक्षा रद्द करण्यात यावी अशी शिफारस सदर अहवालामध्ये करण्यात आली आहे.

सदर प्राथमिक चौकशी अहवाल व शिफारशी महानगरपालिका आयुक्तांनी स्विकारल्या असून, सदर परीक्षा रद्द करण्यास आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. त्यानुसार वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदासाठीची परीक्षा रद्द करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिनांक २४/०७/२००७ रोजीच्या परिपत्रकानुसार दिनांक ०७/०७/२००५ पासून कालबध्द पदोन्नती योजना लागू करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांची एकाच पदावरील सातत्याची सेवा १२ वर्षे किंवा अधिक झाली आहे अशा कर्मचाऱ्यांस पदोन्नती साखळीतील त्या पदाच्या पदोन्नतीची उच्च वेतनश्रेणी, कालबध्द पदोन्नती योजनेस पात्र झालेल्या कर्मचाऱ्यास मिळते. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार कालबध्द पदोन्नती योजनेचा लाभ मिळण्यासाठी पदोन्नतीच्या सर्व निकषांची पूर्तता होणे बंधनकारक आहे. त्यानुसार कनिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यकांनी वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदाकरीता पदोन्नतीची अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि, सदर कर्मचारी अर्हताकारी परीक्षेची अट पूर्ण करीत नव्हते. त्यामुळे ते कालबध्द पदोन्नतीच्या योजनेच्या लाभापासून वंचित होते. तथापि, मानवतेच्या दृष्टीकोनातून व विशेष लाभ म्हणून महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक विभागातील कनिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यकांना स्थायी समितीच्या दिनांक १०/०८/२०१६ रोजीच्या ठरावानुसार परीक्षेची अट शिथिल करुन कालबध्द पदोन्नतीचे लाभ लागू करण्यास मंजुरी देण्यात आली असून, त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांना दिनांक १०/०८/२०१६ पासून कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.